अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 02 एप्रिल 2026 | वर्ष 11 वे | अंक 33 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# उद्यान सांभाळता येत नसेल तर जागा परत करा

## ब्रम्हपुरी नगर परिषदेला बारई समाजाचा इशारा

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील मुख्य आकर्षण असलेल्या ख्रिस्तानंद चौक येथील सार्वजनिक उद्यानाची अवस्था सध्या अत्यंत दयनीय झाली आहे. नगर परिषदेच्या उदासीनतेमुळे या उद्यानाचा श्वास गुदमरत असून, कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या सुविधा अल्पकालावधीतच निकामी झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, प्रशासनाने याकडे लक्ष न दिल्यास उद्यानाची जागा परत घेण्याचा इशारा मूळ मालक असलेल्या बारई समाजाने दिला आहे.

लहान मुलांच्या मनोरंजनासाठी उद्यानात बसविण्यात आलेले झोपाळे, घसरगुंडी आणि इतर खेळणी



काही महिन्यातच तुटून पडली आहेत. खेळणी वापरण्यायोग्य राहिली नसल्याने परिसरातील बालके खेळाला मुकली आहेत. इतक्या कमी कालावधीत ही खेळणी खराब कशी झाली? साहित्याचा दर्जा निकृष्ट होता का? असे गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहेत. या कामाची सखोल चौकशी करून दोषी कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी पालकांनी केली आहे.

उद्यान परिसरात असलेल्या सार्वजनिक शौचालयाची स्थिती अत्यंत भीषण आहे. नियमित साफसफाई होत नसल्याने तिथे प्रचंड दुर्गंधी पसरली असून, व्यायामासाठी आणि फिरण्यासाठी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. उद्यानात फेरफटका मारणे तर दूरच, पण तिथून चालणेही आता कठीण झाले आहे.

उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वारावरच स्थानिक विक्रेत्यांनी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केले आहे. यामुळे उद्यानात येणाऱ्या नागरिकांना आपली वाहने उभी करण्यासाठी जागा उरलेली नाही. रस्त्यावर अस्ताव्यस्त उभ्या असलेल्या वाहनांमुळे वाहतुकीचा प्रश्न गंभीर झाला असून वारंवार छोटे-मोठे अपघात घडत आहेत.



(उद्यानातील क्षतीग्रस्त खेळणी व प्रसाधनगृहातील सामान)



स्थानिक नागरिकांनी या समस्यांबाबत ब्रम्हपुरी नगर परिषदेकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. मात्र, अद्यापही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. प्रशासनाच्या या ढिम्म भूमिकेमुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष असून, येत्या काही

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# ब्रम्हपुरीच्या पर्यटनाला 'ब्रँड ॲम्बेसेडर' मिळाला

## भारतरत्न सचिन तेंडुलकर याच्या भेटीने कच्चेपार सफारीचा जगभरात डंका

ब्रम्हपुरी/का.प्र.

मैदानावरील आपल्या फलंदाजीने जगाला मंत्रमुग्ध करणारे क्रिकेटचे दैवत, भारतरत्न सचिन तेंडुलकर यांनी नुकतीच सहकुटुंब निसर्गाच्या सानिध्यात हजेरी लावली. सिंदेवाही तालुक्यातील कच्चेपार जंगल सफारीचा आनंद घेतल्यानंतर त्यांनी ब्रम्हपुरी वनविभागातील एकारा येथील वनविश्रामगृहाला



भेट दिली. तेंडुलकर यांच्या या अनपेक्षित भेटीमुळे वनविभागासह स्थानिक पर्यटकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.

ब्रम्हपुरी वनविभागांतर्गत नव्याने सुरू झालेली कच्चेपार जंगल सफारी सध्या वन्यजीव प्रेमींचे मुख्य आकर्षण ठरत आहे. या सफारीची माहिती मिळताच सचिन तेंडुलकर यांनी विशेष रस दाखवून आपल्या कुटुंबासह जंगलभ्रमंती केली. सफारी दरम्यान त्यांनी केवळ वाघांच्या अस्तित्वाचा मागोवा घेतला नाही, तर जंगलातील जैववैविध्य (Biodiversity), पर्यावरण संतुलन, वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास यांचे अतिशय बारकाईने निरीक्षण केले. निसर्गाच्या या अवर्णनीय रूपाने ते भारावून गेले होते.

सफारी आटोपल्यानंतर तेंडुलकर अवघ्या १० किमी अंतरावर असलेल्या एकारा वनविश्रामगृहात मुक्कामी पोहोचले. येथील घनदाट झाडी, शांत वातावरण आणि आल्हाददायक हवेने त्यांनी आपला थकवा विसरला. यावेळी त्यांनी उपस्थित वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला. विशेषतः ब्रम्हपुरी परिसरात वाढत्या संघर्षावर त्यांनी चिंता व्यक्त करत उपाययोजनांची माहिती घेतली. वाघ आणि इतर प्राण्यांच्या संरक्षणासाठी वनविभाग करत असलेल्या कामाचे त्यांनी कौतुक केले. 'जंगल संवर्धन ही केवळ सरकारची जबाबदारी नसून, प्रत्येकाने त्यासाठी पुढे येण्याची गरज आहे,' असे आवाहन तेंडुलकर यांनी यावेळी केले.

तेंडुलकर यांच्या आगमनानिमित्त वनविभागाने चोख बंदोबस्त ठेवला होता. उपवनसंरक्षक डॉ. कुमारस्वामी,

(उर्वरित पान क्र. ६ वर)



संपादकीय...

## कुपोषणाचे दाहक वास्तव

महाराष्ट्र हे देशभरात प्रगती आणि विकासाचे प्रतीक म्हणून ओळखले जाणारे राज्य असतानाच या मनमोहक चित्रामागे राज्यातील आदिवासी दुर्गम भागात कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूंचे जळजळीत वास्तवही दडलेले आहे. गेली अनेक वर्षे त्यावर वेगवेगळ्या पातळ्यांवर बेसुमार चर्चा झडत असताना या कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूच्या मुद्द्यावर मुंबई उच्च न्यायालयाने आणखी एकदा तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. लहान मुले, गर्भवती महिला आणि स्तनदा मातांचे कुपोषणामुळे होणारे मृत्यू अजूनही सुरूच असून प्रगतिशील महाराष्ट्रात ही परिस्थिती दुर्दैवी असल्याचे न्यायालयाला पुन्हा एकदा सरकारला सुनवावे लागले.

एकीकडे अमृतकाळात देश २०४७ सालपर्यंत कोणकोणत्या क्षेत्रात किती प्रगती करायची याचे लक्ष्य ठेवत असतानाच दुसरीकडे मेळघाटसारख्या अतिदुर्गम भागात लहान बालके कुपोषणामुळे माना टाकत आहेत. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट हा एक असा आदिवासी प्रदेश आहे जिथे कुपोषणाचे सर्वाधिक रुग्ण आढळणाऱ्या चिखलदरा आणि धारणी तालुक्यात गेल्या वर्षी दहा हजारांवर बालके कुपोषित असल्याचे सरकारी आकडेवारीतूनच उघड झाले होते. कुपोषण कमी करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार दरवर्षी कोट्यवधींचा खर्च करत असतानाही कुपोषणाचे प्रमाण कमी होण्याचे चिन्ह दिसत नाही. हा प्रश्न आताच ऐरणीवर आला असेही नाही. कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूंच्या दाहक समस्येवर उच्च न्यायालय २००६ सालापासून निर्देश देत आले आहे. तरीही मेळघाटात गेल्या जूनपासून दहा महिन्यांच्या कालावधीत कुपोषणामुळे ६५ बालकांचे मृत्यू झाल्याची माहिती समोर आल्याने आश्चर्य व्यक्त करत उच्च न्यायालयाने याआधीही सरकारवर ताशेरे ओढले होते. सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न इतक्या सहजतेने घेतला जाणे भयानक असल्याबाबत न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे.

भोंदूबाबांच्या कच्छपी लागलेल्या आणि हजारो कोटींचे गैरव्यवहार करण्यात गुरफटलेल्या नेतेमंडळींना कुपोषित आदिवासी क्षेत्राकडे लक्ष देण्यासाठी वेळ कसा मिळणार? यापूर्वीही अनेकदा न्यायालयाने सरकारचे याच समस्येसंदर्भात कान उपटूनही सरकार परिणामकारक काम करताना दिसत नाही. गेल्या दोन दशकांपासून हा प्रश्न अधूनमधून चर्चेत येत असताना त्यावर कायमस्वरूपी उपाय योजला जात नाही. उपाय करत असल्याचे भासवले जात असले तरी त्या उपायांचा अपेक्षितका परिणाम का साध्य होत नाही, याचा विचार करून त्याच्या मुळाशी जावयास हवे.

चुकीचे बालसंगोपन हे मुलांच्या कुपोषणाचे एक प्रमुख कारण आहे. लग्नाचे कमी वय, माता आणि मुलांचे आजारपण, दोन मुलांमधील कमी अंतर अशी इतरही अनेक कारणे आहेत. या भागात उपजत म्हणजे गर्भातच बाळाचा मृत्यू तसेच मातामृत्यूचे प्रमाण भयावह आहे. येथे ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य पथके, फिरती पथके यासह इतरही यंत्रणांमार्फत उपचार आणि उपाय केले जात असल्याचे सांगण्यात येत असताना मुलांचे मृत्यू रोखण्यात का अपयश आले आणि अपेक्षित परिणाम का मिळाला नाही याची कारणे शोधण्याची जबाबदारी सरकारची आहे. काही पाहण्यांमध्ये कुपोषित मुलांसाठी देण्यात येणारे सरकारी योजनांचे फायदे बहुतेकदा संपूर्ण कुटुंबाला मिळत होते आणि त्यामुळे पोषण कमी होत गेल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पोषण संपूर्ण कुटुंबासाठी दिले गेले पाहिजे आणि योग्य पोषण शिक्षणावरही भर दिला पाहिजे, असा निष्कर्ष काढण्यात आला होता. सरकारच्या योजना आणि सवलती अशा सर्व लोकांपर्यंत पोहचत असतीलच याची खात्री नाही. शैक्षणिक पातळीवरही खूपच गंभीर समस्या आहे. शहरातील मराठी शाळा ओस पडत असताना येथील शाळांची आणि तेथील विद्यार्थ्यांची अवस्था कशी असेल, याचा अंदाज बांधता येतो. म्हणूनच केवळ तात्पुरती मलमपट्टी करण्याऐवजी या भागातील आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी सरकारने कायमस्वरूपी योजना राबवल्या तरच त्याचा दूरगामी परिणाम साध्य होऊ शकतो. त्यासाठी सरकारची इच्छाशक्ती मात्र हवी.

# गरजू, होतकरू विद्यार्थ्यांची प्रगती हा संस्थेचा हेतू - अशोक भैया

### माजी विद्यार्थी - पालक सभेत प्रतिपादन

### ३० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप

ब्रह्मपुरी/का.प्र.

'नेवजाबाई भैया हितकारिणी संस्था ही मुळातच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या



प्रेरणेने व कर्मयोग मदनगोपालजी भैया यांच्या दातृत्वाने निर्माण झालेली आहे. या संस्थेने आजवर लाखो विद्यार्थी घडविले. ते आज मोठया पदावर देश, परदेशात आहेत. माजी विद्यार्थी म्हणून त्यांनी आजी विद्यार्थ्यांसाठी हातभार लावावा. संस्थेने विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अनेक दालने खुली केलेली आहेत. गरजू,होतकरु विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी ही संस्था सदैव तत्पर राहिल,' असे विवेचन नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैयांनी केले. ते स्व.हिरालालजी भैया सभागृहात माजी विद्यार्थी - पालक सभा आणि शिष्यवृत्ती वितरण सोहळ्यात उद्घाटक म्हणून बोलत होते.

विचारपीठावर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर, प्रमुख अतिथी म्हणून माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव डॉ धनराज खानोरकर, प्रा विनोद नरड, डॉ रेखा मेश्राम, डॉ राजेंद्र डांगे, प्रभारी डॉ राजू आदे उपस्थित होते. याप्रसंगी पाहूण्यांच्या हस्ते होतकरु, गरजू तीस विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. प्रसंगी पाहूण्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी डॉ राजू आदे, संचालन डॉ प्रकाश वट्टी तर आभार प्रदर्शन प्रा निलिमा रंगारींनी केले. कार्यक्रमाला समस्त प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी, पालक उपस्थित होते. यशस्वीतेसाठी डॉ अतुल येरपुडे, प्रा जयेश हजारे, संजू मेश्राम, अक्षय चहांदेनी सहकार्य केले.

**जल है तो कल है...**

# ब्रम्हपुरीत प्राध्यापकाच्या घरी भरदिवसा चोरी

### दुचाकीसह पावणे दोन लाखांचा ऐवज लंपास

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील टिचर कॉलनी, देलनवाडी परिसरात एका प्राध्यापकाच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी अंदाजे १,७४,५०० रुपयांच्या मुद्देमालावर डल्ला मारला आहे. ही घटना १९ मार्च ते २१ मार्च २०२६ दरम्यान घडली असून, यामध्ये दुचाकी, सोन्या-चांदीचे दागिने आणि इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचा समावेश आहे.

मूळचे बल्लारशा येथील रहिवासी असलेले प्राध्यापक किशोर शंकरराव ईटनकर (३७) हे मागील दीड वर्षांपासून ब्रम्हपुरीतील देलनवाडी परिसरात देवेंद्र वरघणे यांच्या घरी भाड्याने राहतात. ते लाखांदूर येथील यशवंतराव चव्हाण कॉलेजमध्ये कार्यरत आहेत. १९ मार्च रोजी दुपारी २:०० वाजताच्या सुमारास प्रा. ईटनकर हे पत्नी आणि मुलासह शेगाव येथे गजानन महाराज दर्शनासाठी गेले होते. घर बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. २१ मार्च रोजी सकाळी प्रा. ईटनकर शेगाववरून परत येत असताना, त्यांच्या शेजारी राहणाऱ्या अनिता अवसरे यांनी त्यांना फोनवरून माहिती दिली की, त्यांच्या घराच्या गेटचे कुलूप तुटलेले असून दरवाजा उघडा आहे. तसेच अंगणात उभी असलेली ॲक्टिव्हा गाडीही गायब आहे. ईटनकर कुटुंबीय घरी पोहोचले असता त्यांना चोरी झाल्याचे स्पष्ट झाले.

चोरट्यांनी घरातील किचनचा मागील दरवाजा तोडून आत प्रवेश केला आणि बेडरूममधील साहित्य अस्ताव्यस्त फेकून होंडा ॲक्टिव्हा (क्र. MH 34 CS 9375) किंमत रु. ९०,०००/-, २ जिवत्या आणि २ अंगठ्या (साडेचार ग्रॅम) - किंमत अंदाजे रु. ४६,०००, ३ जोड चाळ (२० तोळे) व मुलाचे २ जोड वाळे (५ तोळे) - किंमत रु. २७,५००/-, HP कंपनीचा लॅपटॉप आणि ४ सॅनडिस्क पेनड्राइव्ह - किंमत रु. ९,०००/-, व देवघरातील गाडग्यात ठेवलेले २,००० रुपये असा एकूण १,७४,५०० रुपयांचा माल अज्ञात इसमाने चोरून नेला. प्रा. किशोर ईटनकर यांनी या घटनेबाबत ब्रम्हपुरी पोलीस स्टेशनमध्ये रीतसर तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५, ३३१ (३), ३३१ (४) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. भरवस्तीत झालेल्या या चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## विनोदिनी

शाळेतील प्रथम सत्राची परीक्षा संपली होती... गुरूजी मुलांचे पेपर तपासत होते... त्यात गण्या आणि मन्या या दोघानी सोडवलेल्या प्रश्नांची उत्तरं एकसारखीच असल्याचं पाहून शिक्षकांनी वर्गात आल्याबरोबर दोघांनाही समोर बोलावलं...

गुरूजी : या दोघांच्याही उत्तरपत्रिकांमधील उत्तरं एकसारखीच आहेत. या दोघांचे नंबरही परीक्षेच्या वेळी पुढे मागे होते. त्यामुळे यांनी कॉपी केली आहे, हे निश्चित... गण्या तुला काही बोलायचं आहे का यावर?

गण्या : 'अहो गुरुजी, आमच्या उत्तरपत्रिकांचं काय सांगताय, प्रश्नपत्रिका पाहा ना... आमच्याच नव्हे तर वर्गातील सगळयांच्या प्रश्नपत्रिकाच जशाच्या तशा होत्या. त्याचं काय...???

# तनय देशकर यांच्या पाठपुरामुळे मुरपार येथील कॅन्सर रुग्णावर मोफत शस्त्रक्रिया

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील मुरपार येथील प्रीतम सातपुते यांना कॅन्सरचे निदान झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबावर चिंतेचे सावट पसरले होते. चंद्रपूर येथील टाटा कॅन्सर रुग्णालयात तपासणीनंतर डॉक्टरांनी तातडीने ऑपरेशन करण्याचा त्यांना सल्ला दिला, मात्र ऑपरेशनसाठी लाखो रुपयांचा खर्च असल्याने कुटुंब आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडले होते. अशा कठीण परिस्थितीत मुरपार येथील भाजपा नेते धनराज सातपुते यांनी ही बाब भाजपा युवा



मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस तनय देशकर यांच्या निदर्शनास आणून दिली. परिस्थितीची तिव्रता लक्षात घेत तनय देशकर यांनी केवळ पुढाकारच घेतला नाही, तर संपूर्ण प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करत राज्याचे माजी मंत्री व आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्याशी संपर्क साधला.

या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन सुधीर मुनगंटीवार यांनीही त्वरित प्रतिसाद देत नागपूर येथील खाजगी रुग्णालयाशी समन्वय साधला व आवश्यक त्या सूचना दिल्या. माजी मंत्री मान. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्रक्रिया जलद गतीने पूर्ण झाली आणि अखेर प्रीतम सातपुते यांचे कॅन्सरचे ऑपरेशन पूर्णपणे मोफत यशस्वीरीत्या पार पडले.

दरम्यान, ऑपरेशननंतर तनय देशकर यांनी मुरपार येथे सातपुते यांच्या निवासस्थानी भेट देत प्रीतम सातपुते यांच्या तब्येतीची विचारपूस केली. यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी सविस्तर संवाद साधत त्यांना धीर दिला व भविष्यातही आपण सोबत आहोत, असा विश्वास दिला. या. भेटी दरम्यान मुरपार भाजपा नेते धनराजजी सातपुते, बूथ प्रमुख यशवंतजी देशमुख, भाजपा जिल्हा सचिव साकेतजी भानरकर, तालुका सचिव अभयजी कुथे, सोशल मीडिया संयोजक धीरजजी पाल व भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

# गणेश ॲग्रिकल्चरल एजन्सीच्या पाणपोईचे लोकार्पण

ब्रम्हपुरी/का.प्र.

राम नवमीच्या शुभपर्वावर गुरुवार दि. २६ मार्च २०२६ ला ब्रम्हपुरी येथील प्रतिष्ठित व्यापारी पंढरीनाथ खानोरकर यांनी रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची व वाटसरूंची तहान भागविण्यासाठी येथील




भगतसिंग चौकात गणेश ॲग्रिकल्चरल एजन्सीतर्फे पाणपोई सुरु करण्यात आली.

गणेश ॲग्रिकल्चरल एजन्सीचे मालक व समाजसेवक तथा समाजगौरव पुरस्कार प्राप्त भगतसिंग चौकात असलेल्या आपल्या प्रतिष्ठानाचे लगत मागील २३ वर्षापासून पाणपोई सुरु करून सामाजिक बांधीलकी जोपासली आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस आहे. त्यामुळे नागरिकांना योग्य वेळी व योग्य ठिकाणी थंड पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे. या उदात्त हेतुने मागील ६ वर्षापासून थंड पाण्याकरीता वाटर कुलरचे आयोजन करण्यात येत आहे.

यावर्षी वाटर कुलरचे लोकार्पण योगेशजी मिसार अध्यक्ष व्यापारी संघटना तथा नगराध्यक्ष यांचे शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी दिपक उराडे, मोंटू पिलारे, हितेन्द्रजी राऊत, गुलाबराव चौधरी, टिकारामजी जराते, गुलाबराव कोहळे, पंढरीजी खानोरकर, राम समर्थ, गोलू साखरकर, अनिरुद्ध राऊत, भास्कर सहारे, प्रविण मेश्राम, प्रविण शेंडे, कवि कामथे, ताराचंदजी राखडे, अमित तुपट उपस्थित होते.

# धाडसी मयूर देवढगलेचा महाराष्ट्र विद्यालयात सत्कार सोहळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील पिंपळगाव (भो.) येथील राजेश्वर देवढगले आणि त्यांचा पुतण्या मयूर



देवढगले दोघेही आपल्या शेतातील धानाला पानी देण्याकरिता गेले असता अचानक राजेश्वर देवढगले यांच्यावर वाघाने हल्ला केला. असता मयुरने धाडस दाखविल्याचे राजेश्वर यांचा जीव वाचल्याने त्याचा महाराष्ट्र विद्यालयाच्या वतीने सत्कार करून कौतुक करण्यात आले.

शेतावर पिकाला पाणी देण्याकरीता गेलेल्या राजेश्वर यांचेवर बिबट्याने हल्ला केला. त्यांनी जीव वाचविण्याकरिता आरडाओरड केली. त्यामुळे त्यांच्यापासून काही अंतरावर असलेला त्यांचा पुतण्या महाराष्ट्र विद्यालय पिंपळगाव येथील विद्यार्थी मयूर लोमेश्वर देवढगले वर्ग ९ वा अ वय १५ वर्ष याने आपल्या जीवाची पर्वा न करता हिंमत व साहस चे दर्शन दाखवीत आपल्या हातातील गवत कापण्याचे साधन (विळा) घेऊन धावला. मयूर जवळ येताच बिबट्या पळून गेला. अशाप्रकारे १५ वर्षाच्या मयूर ने आपल्या काकाचे जीव वाचविले.

मायूरच्या या बहादूरकीबद्दल महाराष्ट्र विद्यालय पिंपळगाव (भो.) येथील मुख्याध्यापक ओमप्रकाश बगमारे व शिक्षक वृंद यांच्या हस्ते मयूर ला पुष्पगुच्छ व पारितोषिक देऊन त्याचा सत्कार करण्यात आला. मयूरला काकाला वाघाच्या तावडीतून सोडविण्यात यश आले. एवढेच नव्हे तर धाडसी मयूरचे पिंपळगाव, अर्हेरनवरगाव परिसरातील लोकाकडून कौतुक करण्यात येत आहे.

# मुलींनी शिक्षणातून स्वतःची ओळख निर्माण करावी - गणेश तर्वेकर

**बी.ए. व बी.एस्सी. तृतीय वर्षातील विद्यार्थिनींचा निरोप समारंभ**

नागभीड/प्रतिनिधी

समिधा सेवा संस्था द्वारे संचालित सरस्वती जैरामजी तर्वेकर महिला महाविद्यालय,



नागभीड येथे बी.ए. व बी.एस्सी. तृतीय वर्षातील विद्यार्थिनींकरिता निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे सचिव अजय काबरा यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला. या निरोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष गणेश तर्वेकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रभाकर सावरकर उपस्थित होते तसेच प्राचार्या डॉ. रेखा जीभकाटे आणि विद्यार्थिनी प्रतिनिधी विशाखा ठीकरे यांनीही मंचावर उपस्थिती होती.

यावेळी अध्यक्षीय भाषणात गणेश तर्वेकर म्हणाले, 'विद्यार्थिनींनी केवळ पदवी घेऊन थांबू नये, तर आपल्या ज्ञान, संस्कार आणि आत्मविश्वासाच्या जोरावर समाजात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करावी. यश मिळवण्यासाठी सातत्य, प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रम हाच खरा मंत्र आहे.' असा मोलाचा सल्ला दिला. प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींना पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत मार्गदर्शन केले.

निरोप समारंभात विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त करत महाविद्यालयातील आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमात विविध सांस्कृतिक उपक्रमांनी रंगत आणली. कार्यक्रमाचे आयोजन सुयोग्यरीत्या पार पडल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

# लोहारडोंगरी खाण प्रकल्पाबाबत केंद्र सरकारने दखल घ्यावी - खास. डॉ. किरसान

ब्रम्हपुरी/का.प्र.

चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी तालुक्यातील लोहारडोंगरी येथे प्रस्तावित असलेल्या लोहखनिज (Iron Ore) खाण प्रकल्पाच्या अनुषंगाने, गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी लोकसभेत मुद्दा उपस्थित केला. या प्रकल्पाचे गांभीर्य लक्षात घेता केंद्र सरकारने यात तातडीने दखल द्यावी आणि पर्यावरण संरक्षणासाठी आवश्यक पावले उचलावीत, अशी विनंती त्यांनी केली.

खासदार नामदेव किरसान यांनी संसदेत नमूद केले की, लोहारडोंगरी येथील प्रस्तावित खाणकामासाठी सुमारे ३५३ हेक्टर वनजमीन आणि त्यातील १८,००० वृक्षांची होणारी संभाव्य कत्तल ही चिंतेची बाब आहे. हा



संपूर्ण परिसर ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प आणि घोडाझरी वन्यजीव अभयारण्याला जोडणारा महत्त्वाचा 'वाइल्डलाईफ कॉरिडॉर' आहे. त्यामुळे, या प्रकल्पाचा वन्यजीव अधिवासावर काय परिणाम होईल, याचा सखोल विचार होणे गरजेचे आहे.

हा प्रकल्प पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत घातक असून स्थानिक लोकांचा याला मोठा विरोध आहे राज्य वन्यजीव मंडळाच्या समितीनेही या प्रकल्पाबाबत काही महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली आहेत. स्थानिक नागरिकांच्या मनात असलेल्या शंका आणि पर्यावरणाचे रक्षण या दोन्ही गोष्टींचा समतोल राखण्यासाठी केंद्र सरकारने या विषयात हस्तक्षेप करावा, अशी मागणी खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी संसदेत केली.

# बाबाजान उर्स महोत्सवात दरबारी भाविकांची गर्दी



ब्रम्हपुरी/का.प्र.

अल्हाज हजरत सैय्यद मोहम्मद ईकबलशाहा बाबा उर्फ बाबाजान कादरी चिस्ती चिंचोलीच्या उर्स मुबारक कार्यक्रमात चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया व नागपूर जिल्ह्यातील भाविक भक्ताची मोठ्या प्रमाणात गर्दी उसळली होती. दरबारी सेवकाचा व चिंचोली बु. येथील जेष्ट नागरिकाचा व विद्यार्थ्याचा जाहीर सत्कार करण्यात आला. त्यामुळे भक्तामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाला होता.

अल्हाज हज़रत सैय्यद मोहम्मद इकबालशाह बाबा उर्फ बाबाजान कादरी चिस्ती चिंचोली (बु) ता.ब्रम्हपुरी आयोजित 'उर्स मुबारक' व शानदार कव्वाली कार्यक्रमाच्या प्रसंगी विशेष अतिथी म्हणून आदरणीय अम्मासाहेब, शफिबाबा, शरीफबाबा, रामदास मसराम आमदार आरमोरी, नागोजी पिलारे भाजपा ज्येष्ठ नेते, योगेश मिसार नगराध्यक्ष नगर परिषद ब्रम्हपुरी, लता सुंदरकर नगराध्यक्ष नगर परिषद देसाईगंज, तुषार सोम भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य, डी. डी. राजपूत उपविभागीय पोलीस अधिकारी, प्रमोद बानबले पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी, प्रितेश कळीखाये अधिक्षक आरमोरी व अन्य मान्यवर उपस्थित होते. अल्हाज हजरत सैय्यद मोहमद ईकबलशाहा बाबा उर्फ बाबाजान चिशती चिंचोली येथे अम्मासाहेबा, शफीबाबा, शरीफबाबा यांच्या मार्गर्शनाखाली दरवर्षी उर्स् मुबारक व दरबारी मोहन गिरी, हाजी मोहम्मद मोहरम अन्सारी, राहुल सपाटे, घनश्याम बुराडे, व डॉ. सामीया खान, डॉ.श्रुती गोगल, गायत्री कोनघाटवार, प्रणय उपासे, क्रिष्णा बुल्ले, सोहम तिजारे, रोशन गेडाम यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विजेंद्रजी बत्रा तर आभार प्रदर्शन वसंतराव गोगल सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अल्हाद हजरत सैय्यद ईकबलशाहा बाबा उर्फ बाबाजान दरबारी सेवक, सार्वजनिक मंडळ चिंचोली व पोलिस कर्मचारी, गावातील पुरुष, महीला, युवक मंडळ तसेच भक्तगण यांनी मोलाचे सहकार्य केले.

# अऱ्हेरनवरगांव येथे श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रा उत्साहात संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

श्री राम देवस्थान व श्रीराम जन्मोत्सव समिती, अऱ्हेरनवरगांव यांच्या वतीने पारंपारिक पद्धतीने चालत आलेली परंपरा कायम राखून याही वर्षी श्रीराम नवमी जन्मोत्सव व शोभायात्रा मोठ्या थाटात ग्रामपंचायत पटांगण येथे साजरी करण्यात आली. दिंडी भजन च्या नाच गाण्यात श्रीरामाचे रथ विधिवत पूजा करून दर्शनासाठी ग्रामपंचायत पटांगणात गावातील चार देव एकत्र ठेवण्यात आले. मोठ्या भक्ती भावाने लोकांनी त्यांचे दर्शन घेऊन समाधान व्यक्त केले. श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने शाहीर निशान सुखदेवे यांच्या कोहिनूर बहुउद्देशीय सांस्कृतिक लोककला निकेतन पारडी तिरंगा निशान यांच्या राष्ट्रीय खडा तमाशाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाचे उद्घाटक मोन्टूभाऊ पिलारे नगरसेवक ब्रम्हपुरी यांनी नेताजी मेश्राम माजी सभापती पंचायत समिती ब्रम्हपुरी, यांच्या अध्यक्षतेखाली उपाध्यक्ष सुधीर शिवरकर माजी उपसरपंच तोरगाव बूज यांच्या विशेष उपस्थित आणि राकेश पडोळे नगर सेवक ब्रम्हपुरी, अरुण अलोने संचालक कृषी उ. बा. समिती ब्रम्हपुरी, किशोर बगमारे संचालक कृषी उ. बा. समिती ब्रम्हपुरी, नथुजी ठवरे, राजेश तलमले बोंडेगाव, अकुल राऊत, होमराजजी राऊत, अमरदीपजी लोखंडे, रमेशजी ठेंगरे, संजय ढोरे, मुन्ना टेंभुरकार, दुर्वाजी खोब्रागडे, लालाजी तुपट, डॉ. खंडाईत, अरविंद ठेंगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन पार पाडले.

या कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन वामन मिसार यांनी केले. यशस्वितेसाठी डॉ. हरिश्चंद्र ठेंगरे, ईश्वर कुथे, विनीत ठेंगरे, धनु मेश्राम व गावकरी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# पोलीसांकडून १० गोवंशाची सुटका; दोन आरोपींना अटक

## हळदा-वांद्रा मार्गे सुरू होती जनावरांची चोरटी वाहतूक

ब्रह्मपुरी /का.प्र.

प्राण्यांना निर्दयतेने एका पिकअप वाहनात कोंबून त्यांची अवैध वाहतूक करणाऱ्या टोळीचा ब्रह्मपुरी पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. २५ मार्च २०२६ च्या पहाटे डोरली फाटा येथे केलेल्या नाकाबंदी दरम्यान पोलिसांनी १० गोवंशाची सुटका केली असून, एकूण ७ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

बुधवार, २५ मार्च रोजी पहाटे ४ वाजेच्या सुमारास हळदा-वांद्रा मार्गे एका पिकअपमधून जनावरांची चोरटी वाहतूक होणार असल्याची खात्रीशीर माहिती ब्रह्मपुरी पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे सहा. पोलीस निरीक्षक मनोज खडसे आणि त्यांच्या पथकाने हळदा-गांगलवाडी रोडवरील डोरली फाट्यावर सापळा रचला. सकाळी ५ वाजेच्या सुमारास हळदा कडून येणारी टाटा इन्फ्रा पिकअप (क्रमांक - MH 34 BZ 6959) थांबवून तपासणी केली असता, त्यात ७ गायी, २ कालवड आणि १ गोरा असे एकूण १० गोवंश अत्यंत निर्दयतेने, चारा-पाण्याची कोणतीही सोय न करता कोंबलेले आढळले. पोलिसांनी घटनास्थळावरून संतोष रामराव थोरात (वय ४८, रा. शास्त्रकार ले आऊट, चंद्रपूर) व एजाज असलम बॅग (वय ३६, रा. बगलखिडकी, चंद्रपूर) या दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. अधिक चौकशी केली असता, ही जनावरे कुलमुद माहुरे (रा. नवेगाव, ता. ब्रह्मपुरी) याने भरून दिली असून ती चंद्रपूर येथील मालक मोहसीन कुरेशी (रा. रहमतनगर) याच्याकडे नेली जात असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी पिकअप वाहन आणि जनावरे असा एकूण ७,५०,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनमध्ये अपराध क्रमांक ३३३/२०२६ अन्वये प्राणी छळ अधिनियम १९६०, महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्व गोवंशाची वैद्यकीय तपासणी करून त्यांची रवानगी गोविंद गोशाळा, हळदा येथे सुरक्षितरीत्या करण्यात आली आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय अधिकारी दारासिंग राजपूत आणि पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांनी केली.

# 'लिमिट'च्या नावाखाली शासनाकडून शेतकऱ्यांची अडवणूक!

## हजारो क्विंटल धान खरेदीअभावी केंद्रांवर पडून, प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे शेतकरी संतप्त

ब्रम्हपुरी/का.प्र.

यंदा निसर्गाने साथ दिली, धान जोमाने आले, पण आता हेच पीक शेतकऱ्यांच्या गळ्याचा फास बनू पाहत आहे. जिल्ह्यातील धान खरेदी प्रक्रियेत शासनाच्या 'लिमिट' (उद्दिष्ट) धोरणामुळे गंभीर अडथळा निर्माण झाला असून, हजारो क्विंटल धान खरेदी केंद्रांवर उघड्यावर पडून आहे. 'पीक जास्त आले तर तो आमचा गुन्हा आहे का?' असा आर्त सवाल आता संतापलेला शेतकरी विचारत आहे.

तालुक्यात यंदा अनुकूल हवामानामुळे धानाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले. मात्र, शासनाने प्रत्येक केंद्रासाठी ठरवून दिलेले खरेदीचे उद्दिष्ट (Limit) पूर्ण झाल्याचे सांगत केंद्रांवरील अधिकाऱ्यांनी खरेदी बंद केली आहे. वाढीव उत्पादनाची नोंद घेण्यासाठी किंवा नवीन खरेदी करण्यासाठी शासन स्तरावरून अद्याप कोणतीही हालचाल झालेली नाही. खरेदी केंद्रांवर धानाच्या पोत्यांचे ढीग साचले आहेत. अनेक दिवसांपासून शेतकरी केंद्रांच्या फेऱ्या मारत आहेत, परंतु 'लिमिट संपली' हे

**'हे केवळ धान नाही, तर आमच्या कुटुंबाच्या उपजीविकेचा आधार आहे. वर्षभर घाम गाळून पिकवलेला माल मातीमोल होताना पाहणे असह्य होत आहे. शासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास आम्हाला रस्त्यावर उतरल्याशिवाय पर्याय नाही.' - एक त्रस्त शेतकरी**

एकच उत्तर त्यांना मिळत आहे. उघड्यावर असलेल्या धानावर अवकाळी पाऊस किंवा आर्द्रतेचा परिणाम होऊन धान खराब होण्याची भीती निर्माण झाली आहे. मुलांचे शिक्षण, लग्नकार्य आणि कर्जाचे हप्ते फेडण्यासाठी शेतकरी या धानाच्या पैशांवर अवलंबून आहे. खरेदी रखडल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेला ब्रेक लागला आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रश्नी पाठपुरावा केल्याचे सांगितले जात असले, तरी 'लिमिट' वाढवण्याचा प्रस्ताव अद्याप शासकीय स्तरावर धूळ खात पडला आहे. ही फाईल मंत्रालयातील कोणत्या टेबलावर अडकली आहे, याबाबत प्रशासन स्पष्टता द्यायला तयार नाही. यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. शेतकऱ्यांचा संयम आता सुटत चालला आहे. खरेदी प्रक्रिया त्वरित सुरळीत न झाल्यास जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकरी संघटनांनी दिला आहे. 'प्रत्येक दाणा खरेदी होईपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही,' अशी आक्रमक भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. धान खरेदीचे उद्दिष्ट तातडीने वाढवणे, खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, साठवणुकीसाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करणे ही प्रशासनासमोरची आव्हाने आहेत. आता चेंडू राज्य शासनाच्या दरबारात असून, शासन शेतकऱ्यांना दिलासा देते की त्यांच्या कष्टाची थट्टा करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ब्रम्हपुरीत श्रीराम नामाच्या जयघोषात भव्य शोभायात्रा

## विविध देखाव्यांनी वेधले नागरिकांचे लक्ष

ब्रह्मपुरी/का.प्र.

स्थानिक श्रीराम मंदिर, जाणी वार्ड येथून दरवर्षीप्रमाणे यंदाही २६ मार्च रोजी श्रीराम नवमीच्या निमित्ताने भव्य श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रा मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात काढण्यात आली. श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने आयोजित या सोहळ्यात हजारो भाविकांनी सहभाग नोंदवत 'जय श्रीराम'च्या घोषणांनी शहर दुमदुमून टाकले. आकर्षक देखावे आणि सांस्कृतिक वैभव शोभायात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे विविध संस्थांनी सादर केलेले नयनरम्य देखावे होते.

यात प्रामुख्याने रा. स्व. संघ, ब्रह्मपुरी नगर: शिस्तबद्ध संचलन आणि राष्ट्रभक्तीचा संदेश, स्वामी विवेकानंद संस्कार वर्ग व चातुर्मास उत्सव समिती : भगवान विष्णुचे दहा अवतार देखावा, शिवजयंती उत्सव समिती तर्फे नाद ब्रम्हा आर्केस्ट्रा लाईव्ह गाण्याचे आयोजन, ब्रह्माकुमारी केंद्र: शांती आणि आध्यात्मिकतेचा संदेश देणारी कलाकृती, राजस्थानी समाज युवा मंडळ: आपल्या पारंपरिक वेशभूषेसह सादर केलेले आकर्षक देखावे आदींचा सहभाग होता.

प्रसंगी शोभायात्रेच्या मार्गावर गुरुदेव भजन मंडळाने सादर केलेल्या सुरेल भजनांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले. भक्तांच्या पावलांना भजनांच्या तालावर ठेका धरण्यावाचून राहवले नाही. श्रीराम जन्मोत्सव उत्सव समितीच्या कार्यकर्त्यांनी नवरात्रोत्सवापासूनच या सोहळ्याची जय्यत तयारी केली होती. शोभायात्रा शिस्तबद्ध रीतीने पार पाडण्यासाठी आणि भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून हे आयोजन यशस्वी केले. जाणी वार्ड येथील श्रीराम मंदिरापासून निघालेली ही शोभायात्रा शहरातील प्रमुख मार्गावरून फिरत असताना ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. यंदाच्या या सोहळ्याने ब्रह्मपुरी शहरात भक्तीचा नवा उत्साह संचारल्याचे पाहायला मिळाले.

पाणी अडवा, पाणी जिरवा...

# डॉ. प्रशांत महाराज ठाकरेंची पुस्तकाचे घराला भेट



ब्रह्मपुरी /का.प्र.

महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार व प्रवचनकार ह.भ.प. डॉ प्रशांत महाराज ठाकरेंनी कुर्झा वार्डातील कवी,लेखक डॉ धनराज खानोरकर यांच्या 'पुस्तकाचे घर'ला नुकतीच आपल्या संघासह भेट देऊन वाचनसंस्कृतीवर चर्चा केली.

या 'पुस्तकाच्या घरा'तील त्यांनी ग्रंथांचे अवलोकन करून या उपक्रमाचे कौतुक केले.डॉ.खानोरकरांनी महाराजांना स्वलिखित संजोरी,ओल्या वेलीची विलांटी,आई लॉकडाऊन म्हणजे काय? व संपादित नाटयस्पंदन स्मरणिका देऊन त्याचा गौरव केला.सोबतच शाल, श्रीफळ देऊन या प्रवचनकारांचे सत्कारही करण्यात आले.तुकडोजी महाराजांची ग्रामगीता व संत गाडगेबाबाचे समाजविचार यावर डॉ प्रशांत ठाकरे महाराजांचे सध्या महाराष्ट्राभर प्रवचन सुरू आहेत.

... QUOTES ...

"Life is what happens to us while we are making other plans."

- Allen Saunders

चारोळी

माझ्याशी वैर करणाऱ्यांवर
मी मात्र प्रेम करीत राहीन...
देवा, तू त्यांच्यावर कोपू नकोस,
नाहीतर माझ्यावर नाव येईल...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# ब्रम्हपुरीत आनंद चेस अकॅडमीचे दिमाखात उद्घाटन



ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक २९ मार्च २०२६ ला श्री डि.एस.बांडे यांचे प्रशिक्षण हॉल मध्ये विद्यार्थ्यांच्या बौद्धिक गुणांना वाव देण्यासाठी आणि ग्रामीण भागातून बुद्धिबळाचे निष्णात खेळाडू घडवण्यासाठी ब्रम्हपुरी शहरात 'आनंद चेस अकॅडमी' या नवीन बुद्धिबळ प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन नुकतेच उत्साहात पार पडले. या केंद्राच्या माध्यमातून स्थानिक खेळाडूंना आता दर्जेदार प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे.

कार्यक्रमाचे मुख्य आयोजक आणि प्रशिक्षक निलेश बांडे व वेदांत बांडे यांच्या पुढाकाराने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. उद्घाटन प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ब्रम्हपुरी तालुका बुद्धिबळ संघटनेचे हरीश्चंद्रजी चोले सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानोपासक विद्यालय तथा ज्यू. कॉलेज निलजचे मुख्याध्यापक धनराज चौधरी होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून ने.ही. गर्ल्स हायस्कूलचे क्रीडा शिक्षक बारेकर सर आणि महेशकुमार राऊत प्रामुख्याने उपस्थित होते.

या कार्यक्रमाला पालक आणि प्रशिक्षणार्थी विद्यार्थी उपस्थित होते. या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रवेशासाठी आणि प्रशिक्षणाबाबत अधिक माहितीसाठी इच्छुक खेळाडूंनी 7083307032 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# स्वतःवर विश्वास ठेवा यश तुमचंच - आशिता भैया

## ने.हि. महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्सचा निरोप समारंभ



ब्रह्मपुरी/का.प्र.


स्थानिक नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटतर्फे सत्र २०२५-२६ मधील वरिष्ठ कॅडेट्ससाठी महाविद्यालयाच्या परिसरात एका भव्य निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. शिस्त, राष्ट्रप्रेम आणि उत्साहाच्या वातावरणात पार पडलेल्या या सोहळयात कॅडेट्सना भविष्यातील वाटचालीसाठी मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

कार्यक्रमाची सुरुवात २० महाराष्ट्र बटालियन एनसीसी, नागपूरचे केअरटेकर ऑफिसर (णऊध) रेवनदास मधुकर बोरकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी या निरोप समारंभाचा उद्देश स्पष्ट करतानाच, गेल्या काही वर्षात कॅडेट्सनी बजावलेली उत्कृष्ट कामगिरी आणि त्यांच्या शिस्तीचे कौतुक केले. या प्रसंगी २० महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे ए.एन.ओ. कॅप्टन अभिजीत परकरवार आणि ३ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसीच्या ए.एन.ओ. कॅप्टन डॉ. कुलजीत कौर गिल यांची विशेष उपस्थिती होती. या दोन्ही मान्यवरांनी कॅडेट्सना सैनिकी जीवनातील मूल्ये आणि नागरी आयुष्यात त्यांचे महत्त्व यावर मार्गदर्शन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मेजर विनोद नरड सर आणि एन. एच. ज्युनिअर कॉलेजचे पर्यवेक्षक प्रा. श्री आनंद भोयर सर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शिस्त आणि राष्ट्रसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण संस्थेतर्फे उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी-सुविधांचा कॅडेट्सनी स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासासाठी योग्य वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या मुख्य अतिथी आशिता भैया (संचालक, एलएमबी पब्लिक स्कूल आणि सदस्या, एनबीएच एज्युकेशन सोसायटी) यांनी कॅडेट्सशी संवाद साधताना त्यांच्यात नवा आत्मविश्वास भरला. त्यांनी 'Believe in yourself' (स्वतःवर विश्वास ठेवा) हा जीवनमंत्र दिला. केवळ लष्करी सेवाच नव्हे, तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात एक जबाबदार नागरिक म्हणून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या सोहळयाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे कॅडेट तेजस सहारे यांचा सत्कार. तेजसची टेरिटोरियल आर्मी पॅरा कमांडो मध्ये निवड झाल्याबद्दल महाविद्यालय आणि एनसीसी युनिटतर्फे त्याचा विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सार्जंट अंकिता कामडी आणि कॅडेट सम्यक पाटील यांनी केले. वरिष्ठ कॅडेट्सनी आपले अनुभव व्यक्त केले, तर कनिष्ठ कॅडेट्सनी देशभक्तीपर नृत्य आणि गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या शेवटी सामूहिकरीत्या 'वंदे मातरम' आणि एनसीसी गीत 'हम सब भारतीय हैं' गायले गेले. कॅडेट समीक्षा राऊत यांनी आभार प्रदर्शन केले. एका स्मरणीय छायाचित्र सत्राने आणि स्नेहभोजनाने (प्रीतीभोजन) या सोहळयाची सांगता झाली.

Miracle constructions & Developers

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर

मो. 8806776699, 9834946501

डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.




प्रो.प्रा. सुरेश सोरते

मो. 8698323337

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स

गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर

नागभीड रोड, ब्रम्हपुरी





रेलींग, ग्रिल व गेट

स्टिलचे नावे बनवून मिळेल.


# ब्रम्हपुरीच्या पर्यटनाला 'ब्रँड ॲम्बेसेडर'...

(पान क्र. ९ वरून)

सहाय्यक उपवनसंरक्षक अरविंद जे., वनपरिक्षेत्र अधिकारी आकाश सोनडवले आणि जीवशास्त्रज्ञ राकेश आहुजा यांनी तेंडुलकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी वनपाल, वनरक्षक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सचिन तेंडुलकर यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय व्यक्तिमत्त्वाने कच्चेपार सफारीला भेट दिल्याने या क्षेत्राचे नाव जागतिक नकाशावर आले आहे. यामुळे भविष्यात ब्रम्हपुरी आणि सिंदेवाही परिसरातील निसर्ग पर्यटनाला मोठी चालना मिळणार असून, कच्चेपार सफारीचा दर्जा आणखी बुलंद होणार आहे.


ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता

www.bramhapuri samachar.com/bs

या ऑनलाईन साईटला भेट द्या

बातम्यांकरीता संपर्क :

मो. 9503100964

मो. 8275715315

नियमित वाचा

अर्धसाप्ताहिक

ब्रम्हपुरी समाचार


# उद्यान सांभाळता येत नसेल तर...

(पान क्र. ९ वरून)

दिवसांत समस्या न सुटल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा रहिवाशांनी दिला आहे.

निवृष्ट दर्जाच्या खेळण्यांची दुरुस्ती करून कंत्राटदाराची चौकशी करावी. शौचालयाची नियमित स्वच्छता राखण्यासाठी कायमस्वरूपी कर्मचारी नियुक्त करावा. प्रवेशद्वाराजवळील अतिक्रमण तात्काळ हटवून वाहनतळ मोकळा करावा. प्रशासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास येत्या काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी दिला आहे. आता नगर परिषद प्रशासन यावर काय पाऊल उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**नगरसेवक मनोज भुपाल यांची चेतावणी : खिस्तानंद चौकातील ज्या जागेवर नगर परिषदेचे उद्यान साकारले आहे, ती जागा पूर्णपणे 'गुरुदेव मंदिर शेष नगर' यांच्या मालकीची आहे. सदर ले-आउट ग्रामपंचायत काळात मंजूर झालेला असून तो अकृषक (Non-Agricultural) आहे. या जमिनीचा ७/१२ आजाही मंदिराच्या नावे असून त्याचे एकूण क्षेत्रफळ ०.४३ आर इतके आहे. तांत्रिकदृष्ट्या हा भूखंड सार्वजनिक वापरासाठी सोडणे समाजावर बंधनकारक नव्हते. मात्र, सामाजिक बांधिलकी आणि जनहित लक्षात घेऊन बारई समाजाने आपला जवळपास अर्धा एकरचा मौल्यवान भूखंड उद्यानासाठी नगर परिषदेला सुपूर्द केला होता. अत्यंत खेदाची बाब अशी की, ज्या विश्वासाने ही जागा प्रशासनाकडे सोपवण्यात आली, त्याला नगर परिषदेने हरताळ फासला आहे. उद्यानातील मुलांची खेळणी निकामी झाली आहेत, स्वच्छतेचा अभाव आहे आणि प्रवेशद्वारावर अतिक्रमणांचा विळखा पडला आहे. उद्यानाची निगा राखण्यात नगर परिषद प्रशासन पूर्णपणे असमर्थ ठरल्याचे दिसून येत आहे. जर नगर परिषद प्रशासनाने उद्यानाचा विकास, खेळण्यांची दुरुस्ती आणि नियमित स्वच्छता याकडे तातडीने लक्ष दिले नाही, तर बारई समाज आपला भूखंड परत घेण्याच्या दिशेने कायदेशीर पावले उचलेल. समाजाची मालमत्ता अशा प्रकारे दुर्लक्षित राहू दिली जाणार नाही. यावर बारई समाजाचे अध्यक्ष तथा नगरसेवक मनोज भूपाल यांनी ठणकावून सांगितले की, आम्ही जनतेच्या सुविधेसाठी जमीन दिली होती, पण जर तिथे असुविधा आणि दुरवस्थाच नशिबी येणार असेल, तर ती जमीन परत मागण्याशिवाय आमच्याकडे दुसरा पर्याय उरणार नाही.**




Lubi PUMPS-MOTORS

बुधवार बंद

- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

Kirloskar CRI

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान

1994 पासून आपल्या सेवेत

किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404